# देशात लवकरच प्लास्टिकच्या नोटा

## उपकंपनीकडून पॉलीमर नोटांसाठी जागतिक निविदा

**मुंबई–** भारतीय रिझर्व्ह बँकेची नोट छपाई करणारी उपकंपनी भारतीय रिझर्व्ह बँक नोट मुद्रण प्रायव्हेट लिमिटेड यांनी पॉलीमर नोटांसाठी जगभरातील उत्पादकांकडून स्वारस्य अभिव्यक्तीपत्रे मागवली आहेत. भारतीय चलनी नोटांच्या छपाईसाठी सुरक्षा वैशिष्ट्यांनी युक्त विशेष पॉलीमर आधारपत्रांचा पुरवठा करण्यासाठी ही जागतिक निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

जारी करण्यात आलेल्या स्वारस्य अभिव्यक्तीपत्रानुसार, सुरुवातीला बीओपीपी आधारित सुमारे ६८ हजार रीम पॉलीमर आधारसामग्रीची आवश्यकता आहे. दोन वेगवेगळ्या मूल्यवर्गांसाठी प्रत्येकी ३४ हजार रीमची मागणी करण्यात आली आहे. एका रीममध्ये ५०० पत्रे असतील. या पॉलीमर पत्रांमध्ये पारदर्शक खिडकीतील चित्र, धातूचा अंक, चुंबकीय छद्म धागा, छायाचित्र आणि इंद्रधनुषी नमुना यांसारखी सुरक्षा वैशिष्ट्ये असणे आवश्यक आहे. या आधारपत्रांचा वापर भारतीय रिझर्व्ह बँक नोट मुद्रण तसेच सिक्युरिटी प्रिंटिंग अँड मिंटिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्या मुद्रण केंद्रांमध्ये नोट छपाईसाठी केला जाणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सुरुवातीच्या टप्प्यात कमी मूल्यवर्गातील म्हणजेच १० आणि २० रुपयांच्या पॉलीमर नोटा जारी होण्याची शक्यता आहे. या नोटांच्या छपाईसाठी वापरली जाणारी शाईदेखील सुरक्षा आवश्यकतांनुसार विशेष पद्धतीने तयार केली जाणार आहे. या निविदेत राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित कठोर अटी घालण्यात आल्या आहेत. निविदेत सहभागी होणाऱ्या कंपन्यांनी चीन किंवा पाकिस्तानमधील आपले कामकाज भारताशी संबंधित कोणत्याही व्यवसायापासून पूर्णपणे वेगळे असल्याचे सुनिश्चित करणे आवश्यक आहे. याशिवाय, कंपन्यांना चीन किंवा पाकिस्तानमधून कच्चा माल खरेदी करता येणार नाही. तसेच, चीन किंवा पाकिस्तानमध्ये कोणत्याही स्वरूपात काम केलेल्या व्यक्तींना नियुक्त करण्यासही मनाई करण्यात आली आहे.भारतासोबत स्थलीय सीमा असलेल्या देशांतील कंपन्यांना पात्र ठरण्यासाठी उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाच्या नोंदणी समितीकडे नोंदणी करणे आवश्यक असेल.

**चाचण्या यशस्वी झाल्यास मोठ्या प्रमाणावर खरेदीची शक्यता**

भारतीय रिझर्व्ह बँक नोट मुद्रण प्रायव्हेट लिमिटेडने स्पष्ट केले आहे की, सध्याची मागणी तातडीच्या गरजेसाठी आहे. पॉलीमर आधारसामग्रीच्या क्षेत्रीय चाचण्या यशस्वी झाल्यास भविष्यात विविध मूल्यवर्गांसाठी मोठ्या प्रमाणावर खरेदी केली जाऊ शकते.देशांतर्गत आणि परदेशी कंपन्या, तंत्रज्ञान सहकारी, संयुक्त उपक्रम भागीदार आणि उपकंपन्या या प्रक्रियेत सहभागी होवू शकतात.

# सर्व प्रवर्गांसाठी नवीन कट-ऑफ गुण जाहीर

## विद्यार्थ्यांना यंदा पात्र ठरवण्यासाठी ७१५ ते २१३ गुण आवश्यक; दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राखीव कट-ऑफ

**मुंबई–** नीट यूजी २०२६ पुनर्परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता विद्यार्थ्यांचे लक्ष कट-ऑफकडे लागले होते. अखेर नीटने आवश्यक पात्रता गुणाची यादी जाहीर केली असून,, यंदा जवळपास सर्वच गटांमध्ये गुणांची मर्यादा वाढल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळवण्याची स्पर्धा मागील वर्षापेक्षा अधिक कठीण होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यंदा पात्रतेसाठी लागणारी पर्सेंटाईल मात्र बदललेली नाही. सर्वसाधारण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी पूर्वीप्रमाणेच ५० पर्सेंटाईल, तर ओबीसी, एससी आणि एसटी प्रवर्गासाठी ४० पर्सेंटाईलचा नियम कायम ठेवण्यात आला आहे. मात्र विद्यार्थ्यांनी मिळवायच्या गुणांमध्ये मोठी वाढ झाल्यामुळे प्रवेशासाठी चांगली तयारी केलेल्या विद्यार्थ्यांनाच फायदा होणार आहे.

सर्वसाधारण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गातील विद्यार्थ्यांना यंदा पात्र ठरण्यासाठी ७१५ ते २१३ गुणांच्या दरम्यान गुण मिळवणे आवश्यक ठरले आहे. गेल्या वर्षी ही मर्यादा खूपच कमी होती. यावरून यंदा विद्यार्थ्यांनी अधिक चांगली कामगिरी केल्याचे स्पष्ट होते. आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीही परिस्थिती जवळपास अशीच आहे. ओबीसी, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या तिन्ही प्रवर्गांमध्ये पात्रतेसाठी आवश्यक गुण वाढले आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांनाही प्रवेश प्रक्रियेत चांगले स्थान मिळवण्यासाठी अधिक गुणांची आवश्यकता भासणार आहे. पर्सेंटाईलचा नियम पूर्वीप्रमाणे कायम असला तरी प्रत्यक्ष गुणांची मर्यादा वाढल्यामुळे स्पर्धा अधिक तीव्र झाली आहे.

**दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राखीव कट–ऑफ**

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या विविध प्रवर्गांमध्येही कट-ऑफमध्ये वाढ करण्यात आली आहे. सर्वसाधारण तसेच आरक्षित गटातील दिव्यांग उमेदवारांना यंदा मागील वर्षाच्या तुलनेत जास्त गुण मिळवावे लागले आहेत. त्यामुळे या गटातील विद्यार्थ्यांसाठीही यंदाचा प्रवेशाचा प्रवास सोपा राहणार नाही. पात्र विद्यार्थ्यांच्या संख्येकडे पाहिले तर सर्वसाधारण आणि ईडब्ल्यूएस प्रवर्गातून सर्वाधिक विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. त्यानंतर ओबीसी, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील हजारो विद्यार्थ्यांनीही पात्रता मिळवली आहे. एकूण मिळून ११.२१ लाखांहून अधिक उमेदवार यंदाच्या परीक्षेत पात्र ठरले आहेत. त्यामुळे देशभरातील वैद्यकीय महाविद्यालयांमधील जागांसाठी मोठी स्पर्धा पाहायला मिळणार आहे.

**पात्र विद्यार्थी या ठिकाणी अर्ज करु शकतात**

यंदाच्या निकालातील आणखी एक विशेष बाब म्हणजे मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी अतिशय उच्च गुण मिळवले आहेत. ७०० पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १९ इतकी आहे. याशिवाय ६५० आणि ६०० पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यामुळेच कट–ऑफ गुणांमध्ये वाढ झाल्याचे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे. निकालानंतर आता वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेची तयारी सुरू झाली आहे. पात्र ठरलेले विद्यार्थी एमबीबीएस, बीडीएस, आयुष आणि इतर वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज करू शकणार आहेत. लवकरच समुपदेशनाचे वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता असून त्यानंतर जागावाटपाची प्रक्रिया सुरू केली जाईल.

योग्य कागदपत्रे, वेळेत नोंदणी आणि पसंतीक्रम भरताना घेतलेला योग्य निर्णय

तज्ज्ञांच्या मते, विद्यार्थ्यांनी आता केवळ गुणांवर अवलंबून न राहता समुपदेशनातील प्रत्येक टप्पा काळजीपूर्वक पूर्ण करणे आवश्यक आहे. योग्य कागदपत्रे, वेळेत नोंदणी आणि पसंतीक्रम भरताना घेतलेला योग्य निर्णय अंतिम प्रवेशासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. एकंदरीत पाहता, नीट यूजी २०२६ मध्ये विद्यार्थ्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली असली तरी वाढलेल्या कट–ऑफमुळे वैद्यकीय शिक्षणाचा मार्ग अधिक स्पर्धात्मक झाला आहे. चांगले गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संधी नक्कीच उपलब्ध आहेत, मात्र प्रवेशासाठी प्रत्येक टप्प्यावर सावधपणे पुढे जाणे गरजेचे ठरणार आहे.

# साखरेच्या वाढत्या किंमतीवर नियंत्रणासाठी साप्ताहिक कोटा आणि वितरण व्यवस्था लागू करण्याचा केंद्राचा विचार

**मुंबई–** साखरेच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकार साप्ताहिक साखर कोटा आणि वितरण व्यवस्था लागू करण्याचा विचार करत असल्याची माहिती उद्योग क्षेत्रातील सूत्रांनी दिली आहे. देशातील प्रमुख साखर उत्पादक राज्य असलेल्या महाराष्ट्रात कारखाना पातळीवरील साखरेच्या किमती जून महिन्यात ३,८०० रुपये प्रति क्विंटल होत्या.१६ जुलैपर्यंत या किमती वाढून ४,४५० रुपये प्रति क्विंटल झाल्या आहेत. व्यापाऱ्यांच्या मते, या कालावधीत साखरेच्या किमतीत सुमारे १७ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

**१० लाख टन साखर आयात करण्याचा विचार**

देशांतर्गत बाजारात साखरेच्या किमतीत सातत्याने वाढ होत असताना केंद्र सरकार सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी शून्य आयात शुल्कावर सुमारे १० लाख टन साखर आयात करण्याचा विचार करू शकते, अशी माहिती उद्योग सूत्रांनी दिली. याशिवाय बाजारातील परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार काही कठोर उपाययोजनांचाही विचार करत आहे. यामध्ये साप्ताहिक आणि पंधरवड्याच्या आधारावर साखर वितरण व्यवस्था लागू करणे तसेच व्यापाऱ्यांसाठी साखर साठवणुकीवर मर्यादा घालणे यांचा समावेश आहे.

**साखरेचे उत्पादन वाढले तरी किमतीत वाढ**

२०२५–२६ च्या साखर हंगामात भारताचे साखर उत्पादन सुमारे २.८ कोटी मेट्रिक टन राहण्याचा अंदाज आहे. मागील हंगामातील २.६२ कोटी मेट्रिक टन उत्पादनाच्या तुलनेत हे अधिक आहे.मात्र, देशांतर्गत बाजारातील उपलब्धता कमी होत असताना मागणी मजबूत राहिल्याने साखरेच्या किमतीवर दबाव वाढला आहे.सरकारने २०२५–२६ च्या साखर हंगामासाठी १५ लाख टन साखर निर्यातीला मंजुरी दिली होती. मात्र, आतापर्यंत सुमारे ७.५ लाख टन साखरेचीच निर्यात झाली आहे. देशांतर्गत मागणी वाढत असून साखरेच्या किमतीतही तेजी दिसत असल्याने सरकार देशातील साखरेच्या एकूण उपलब्धतेचा आढावा घेत आहे.

**प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावर आयातीचा विचार**

उद्योग सूत्रांनुसार, केंद्र सरकार प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर १० लाख टन साखर आयात करण्यास परवानगी देण्याचा विचार करत आहे. आयातीसोबतच सध्या लागू असलेल्या मासिक साखर वितरण व्यवस्थेत बदल करून साप्ताहिक आणि पंधरवड्याच्या आधारावर साखर वितरण व पाठवणी व्यवस्था लागू करण्याची शक्यता आहे. याचा उद्देश देशांतर्गत बाजारात साखरेचा पुरवठा सुरळीत ठेवणे हा आहे. एका उद्योग सूत्राने सांगितले की, साखर आयातीला परवानगी देण्याबरोबरच व्यापाऱ्यांकडे ठेवता येणाऱ्या साखरेच्या साठ्यावरही मर्यादा लागू करण्याचा सरकार विचार करत आहे.

**यापूर्वीही भारताने केली आहे साखर आयात**

या उपाययोजनांना मंजुरी मिळाल्यास वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि देशांतर्गत बाजारात साखरेची सुरळीत उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी हा महत्त्वपूर्ण धोरणात्मक बदल ठरू शकतो.पुरवठ्यात कमतरता निर्माण झाल्याच्या काळात भारताने यापूर्वीही साखर आयात केली आहे. देशाने २००९–१० मध्ये ४१ लाख टन, २०१२–१३ मध्ये १५ लाख टन आणि २०१७–१८ मध्ये २ लाख टन साखरेची आयात केली होती. २००९ मध्ये पुरवठ्याचे संकट निर्माण झाल्यानंतर केंद्र सरकारने १७ एप्रिल ते १ ऑगस्ट २००९ या कालावधीत पांढरी, शुद्ध केलेली आणि कच्ची साखर आयात करण्यास परवानगी दिली होती. याशिवाय देशांतर्गत बाजारात साखरेचा सातत्यपूर्ण पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी मासिक वितरण आदेशांचे विभाजन करून साप्ताहिक आणि पंधरवड्याच्या आधारावर साखर वितरण व्यवस्था सुरू करण्यात आली होती.

# भारतात पहिली हायड्रोजन ट्रेन सुरू



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनला हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. ही ट्रेन जींद ते सोनीपत दरम्यान धावली. यासोबतच, हायड्रोजन इंधनावर चालणारी ट्रेन सुरू करणारा भारत जगातील पाचवा देश बनला आहे. यापूर्वी जर्मनी, फ्रान्स, स्वीडन आणि चीनमध्येच हायड्रोजन ट्रेन्स धावत आहेत.**

# सरकारी कर्मचाऱ्यांना २ टक्के महागाई भत्ता लागू करा

## राजपत्रित अधिकारी महासंघाची मागणी

**मुंबई (प्रतिनिधी)–**केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य सरकारी अधिकारी–कर्मचाऱ्यांनाही १ जानेवारी २०२६ पासून २ टक्के महागाई भत्ता वाढ थकबाकीसह तातडीने लागू करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

केंद्राने १ जानेवारी २०२६ पासून आपल्या कर्मचाऱ्यांसाठी २ टक्के महागाई भत्ता वाढ केली आहे. या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांना ही वाढ या आधीच लागू झाली आहे. त्यामुळे सनदी अधिकाऱ्यांना मिळणारा महागाई भत्ता ५८ वरुन ६० टक्के झाला आहे. मात्र, राज्य सरकारी सेवेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ही वाढ अद्याप मिळालेली नाही, याकडे महासंघाने मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले आहे. वाढत्या महागाईच्या काळात कर्मचाऱ्यांची आर्थिक गैरसोय टाळण्यासाठी राज्य सरकारने तातडीने २ टक्के महागाई भत्ता थकबाकीसह देण्याचा शासन निर्णय निर्गमित करावा, अशी विनंती अधिकारी महासंघाने पत्रात केली आहे.

# ...तरच एनडीएमध्ये या

## भाजपची शरद पवार गटासमोर मोठी अट; राजकारणात घडामोडींना वेग

**मुंबई–** राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे. गेल्या काही दिवसांपासून सातत्याने राष्ट्रवादी शरद पवार गट एनडीएमध्ये येणार असल्याची चर्चा सुरू आहे. आता या पार्श्वभूमीवर मोठी बातमी समोर आली आहे. एनडीएमध्ये येण्याआधी दोन्ही राष्ट्रवादीचं विलिनीकरण करा अशा सूचना भाजपने दोन्ही राष्ट्रवादीला केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दोन्ही राष्ट्रवादींनी आधी एक यावं आणि नंतर मग एनडीएमध्ये या असं भाजपने म्हटल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचं विलिनीकरण झाल्यास दोन्ही राष्ट्रवादींना केंद्रात एक –एक मंत्रिपद देखील मिळणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

काही दिवसांपूर्वी दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकदा एकत्र येणार असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली होती, मात्र त्यामध्ये खंड पडला आहे. तर दुसरीकडे आता राष्ट्रवादी शरद पवार गट एनडीएमध्ये सहभागी होणार असल्याचं बोललं जात आहे. १४ जुलै रोजी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती, त्यानंतर त्यांनी गुरुवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील भेट घेतली. त्यामुळे या चर्चेला आणखी उधाण आलं.

मात्र आता अशी बातमी सूत्रांकडून समोर येत आहे ती म्हणजे आधी दोन्ही राष्ट्रवादीचं विलिनीकरण करा आणि नंतरच एनडीएमध्ये या अशा सूचना भाजपाने राष्ट्रवादी शरद पवार गटाला केल्या आहेत. तसेच दोन्ही राष्ट्रवादीचं जर विलिनीकरण झालं तर दोन्ही राष्ट्रवादीला केंद्रामध्ये एक – एक मंत्रिपद देखील मिळणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे आता विलिनीकरणासंदर्भात नेमका काय निर्णय होणार ते पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.

दरम्यान काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर देखील चर्चेला उधाण आलं होतं. यावरून शिवसेना ठाकरे गटाकडून नाराजी देखील व्यक्त करण्यात आली होती. मात्र आता जर एनडीएमध्ये यायचं असेल तर आधी दोन्ही पक्षांनी एकत्र या अशा सूचना भाजपने केल्याची माहिती समोर येत आहे.

# ऑनलाईन परीक्षांसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य सरकारच्या वतीने घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षा ऑनलाईन घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यासंदर्भात राज्य सरकारला शिफारस करणार आहे. समितीला अहवाल सादर करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात शिक्षक पात्रता परीक्षा पेपरफुटीचा मुद्दा गाजला होता. त्यावेळी राज्य सरकारच्या वतीने सर्व परीक्षा ऑनलाईन घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात येईल, असे जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाने शुक्रवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला.

या समितीत सदस्य म्हणून सामान्य प्रशासन, उच्च आणि तंत्र शिक्षण, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव,शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव, राज्याचे पोलीस महासंचालक यांचा समावेश करण्यात आला आहे. तर राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त हे समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

पान १ वरुन

## महाराष्ट्रात मुसळधार पावसाची...

येत आहेत. या प्रणालीमुळे कोकण, घाटमाथा आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि पालघर जिल्ह्यांत अनेक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची नोंद झाली आहे. मुंबई आणि ठाण्यातही ढगाळ वातावरणासह अधूनमधून मुसळधार सरी कोसळत आहेत. पुढील ४८ तासांत कोकणात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## भंडारदरा पाणलोटात पावसाचा...

दरम्यान, कोतूळ वार्ताहराने कळविले की, मुळा धरणाच्या पाणलोटात पावसाळी वातावरण तयार झाले असून अधूनमधून हलक्या सरी कोसळत आहेत.

## जिल्हा बँकेच्या मतदार यादीत...

कार्यालयाकडून या संस्था सभासदांकडून आलेल्या ठरावाची तपासणी होणार आहे. ही तपासणी पुर्ण झाल्यानंतर ती ठरावाची संख्येची यादी नाशिक विभागीय कार्यालयाकडे जाणार आहे. तेथे देखील यादीची तपासणी होणार असून त्यानंतर प्रारूप मतदार यादी जाहीर होईल. त्यावर हरकती व सुचना मागविण्यात येतील. त्यावर सुनावणी होवून अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

**शेअर्स रक्कम नसेल ते सभासद अपात्र**

जिल्हा बँकेची शेअर्स रक्कम पाच हजार असून ही रक्कम ज्या सभासद संस्थांकडून दिली गेली नाही. अशा सभासद संस्था अपात्र ठरणार असल्याचा ठराव बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत झाला आहे. त्यामुळे आता अशा किती संस्था आहे. हे देखील महत्वाचा ठरणार आहे.

**बँकेने सहकार खात्याला पाठवलेले ठराव**

विकास सेवा संस्था १ हजार ४१४, शेती पूरक २ हजार १३९, बिगरशेती २ हजार ३३७, एकूण बिगरशेती ३ हजार २३५ असे ६ हजार ७८८ ठराव (मतदार) असल्याचे जिल्हा बँकेकडून एक महिन्यांपूर्वीच सहकार खात्याला कळवण्यात आलेले आहेत. यात ८९८ हे व्यक्तीगत सभासद आहेत.

**मतदार यादी दुरूस्तीत कसरत**

जिल्हा बँकेने महिनाभरापूर्वी सहकार खात्याला पाठवलेल्या मतदार यादीतील दुरूस्ती करून नव्याने करेक्ट मतदार यादीत तयार करण्यास सुमारे एक महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सध्या दूग्ध विभागाचे आणि मस्य विभागाचे ठराव दूग्ध विभागाकडे तर सोसायट्यांचे ठराव सहकार विभागाकडे प्राप्त होत आहेत. आलेल्या ठरावीची पडताळणी करून ते योग्य आहेत का? याची तपासणी करून प्रारूप मतदार यादी तयार करण्यात येणार असल्याचे सहकार विभागाकडून सांगण्यात आले.

## ८४३ ग्रा. पं. चा मतदार यादी...

४ ऑग्रस्टला जिल्ह्यात ग्रामपंचायत निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यावर कोणत्याही क्षणी ग्रामपंचायत निवडणुकीचा तर याच दरम्यान जिल्हा बँक निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. यामुळे जिल्ह्यात एकाच वेळी अथवा एकापाठोपाठ ग्रामपंचायत आणि सहकारातील सर्वात मोठी संस्था असणाऱ्या जिल्हा बँक निवडणुकीचा धुराळा उडण्याची शक्यता आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात आठशेहून अधिक ग्रामपंचायतीच्या निवडणुका विविध कारणांनी रखडल्या आहेत. यातील बहुतांश ग्रामपंचायतीवर प्रशासकराज काम करत आहे. निवडणुका रखडल्याने इच्छुकांमध्ये नाराजी आहे तर काही ठिकाणी प्रशासकाच्या कामकाजावर नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. ठराविक जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था वगळता राज्यातील बहुतांश ठिकाणी निवडणुका पार पडलेल्या आहेत. त्यामुळे रखडलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका दिवाळी दरम्यान होण्याची शक्यता आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात प्रभागनिहाय आरक्षण निश्चित झाल्यानंतर निवडणूक आयोगाने मतदार यादीची कार्यक्रम हाती घेतला आहे. या निवडणुकांसाठी संगणकप्रणालीद्वारे मतदार यादी अपडेट केली जाणार आहे. तहसील कार्यालयाला ग्रामपंचायतनिहाय विधानसभा व प्रभागाची माहिती संकलतीत करुन संगणक प्रणालीवर भरायची आहे.

**प्रभागनिहाय आरक्षण निश्चित**

जिल्ह्यातील ग्रामपंचायत प्रभाग आरक्षण सोडत प्रक्रियेवर १५७ हरकती नोंदवण्यात आल्या होत्या. या हरकतींवर उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी पार पडली. उपविभागीय अधिकारी यांचा हरकतीवरील अभिप्राय विचारात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी ८ जुलै रोजी आरक्षण अंतिम केले, तर १० जुलै रोजी आरक्षण जाहीर झाले होते.

## ‘वंदे मातरम’चा अपमान...

**सरकारी कार्यक्रमांमध्ये वंदे मातरम अनिवार्य करण्याची तयारी**

केंद्र सरकारने यापूर्वी सर्व राज्यांना सरकारी कार्यक्रमांमध्ये वंदे मातरमचे गायन किंवा वादन अनिवार्य करण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. आता त्यालाच कायदेशीर स्वरूप देण्यासाठी हे विधेयक आणले जात आहे. सरकारने पावसाळी अधिवेशनासाठी तयार केलेल्या रणनीतीनुसार, सर्वप्रथम महत्त्वाचे अध्यादेश मंजूर केले जाणार असून वंदे मातरम विधेयक त्यात समाविष्ट आहे. याशिवाय आयकर दुरुस्ती विधेयक, सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढवण्यासंबंधी विधेयक आणि इतर अनेक महत्त्वाची विधेयकेही मांडली जाणार आहेत.

**२० जुलै ते १३ ऑगस्ट या काळात अधिवेशन**

सरकारकडे कोणतेही विधेयक मंजूर करण्यासाठी आवश्यक बहुमत असणे गरजेचे आहे. यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर हे विधेयक राज्यसभेच्या कामकाजात समाविष्ट केले जाईल आणि त्यानंतर गृहमंत्री अमित शाह ते सभागृहात मांडतील. हे विधेयक संसदेत दोन्ही सभागृहांत मंजूर झाल्यास वंदे मातरमचा अपमान करणे हा कायद्याने गुन्हा ठरेल. त्यामुळे राष्ट्रीय गीत, राष्ट्रध्वज आणि संविधानाप्रमाणेच वंदे मातरमलाही कायदेशीर संरक्षण मिळेल. दरम्यान, सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार, राष्ट्रगीत जन गण मनचे गायन रोखणे किंवा त्यावेळी जाणीवपूर्वक गोंधळ घालणे हा गुन्हा असून त्यासाठी तीन वर्षांपर्यंतचा तुरुंगवास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. आता प्रस्तावित दुरुस्ती मंजूर झाल्यास वंदे मातरमचे गायन सुरू असताना त्याचा अपमान करणे किंवा त्यात अडथळा आणणे यालाही याच प्रकारची शिक्षा लागू होणार आहे.

## श्रीरामपूरकरांच्या मनातील भीती...

पोहोचविल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.

गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रणासाठी आतापर्यंत विविध गुन्ह्यांतील १४ जणांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. पुढील काळातही अशा कारवाया अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सोशल मीडियावरील अफवांबाबत नागरिकांना सावध करताना त्यांनी, कोणतीही माहिती पडताळणी न करता पुढे पाठवू नका. सोशल मीडियावरील अप्रमाणित पोस्टवर विश्वास ठेवल्यास गैरसमज पसरतात. नागरिकांनी केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन केले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, श्रीरामपूर शहर पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## एसटीच्या भाड्यात १३.५६ टक्के वाढ

कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये करण्यात आलेली वाढ तसेच वाहनांचे सुटे भाग, टायर आणि देखभाल खर्चात झालेली लक्षणीय वाढ यांचा सर्वंकष विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. अर्थात, या भाडेवाढीमुळे यापुर्वी केलेली साध्या बसेसची १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द होईल, असं शासनाकडून प्रसिद्धीपत्रक जारी करुन स्पष्ट करण्यात आलं आहे.

## नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी...

पडलेल्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या. या पुरवणी मागणीत सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आवश्यक कामासाठी तीन हजार कोटी रुपयांची मागणी मंजूर झाली आहे. या मंजूर तरतुदीतील १२०० कोटी रुपये वितरित करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे.

राज्य सरकारने यापूर्वी ऑक्टोबर २०२५ मध्ये २८३ कोटी, डिसेंबर २०२५ मध्ये ७१७ कोटी, फेब्रुवारी २०२६ मध्ये ५०१ कोटी तर मे २०२६ मध्ये ३९६ कोटी असा एकूण १ हजार ८९७ कोटी रुपयांचा निधी कुंभमेळा प्राधिकरणाला दिला आहे.